ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# ग्रामीण महिला आणि शिक्षणाची समस्या

**डॉ. वागडव ए. आर.**
सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद.

काळाच्या ओघात विविध प्रसंग, घटना आणि परिस्थितीजन्य कारणामुळे समाजात पुरूषप्रधान कुटूंबव्यवस्था निर्माण झाली. ग्रामीण पुरुषप्रधान कुटूंब संरचनेत महिलांचा दर्जा हा निम्न आहे. केवळ काही धार्मिक परंपरामध्ये आणि निधीमध्ये महिलांना महत्त्व दिल्या गेले आहे. अन्यथा पुरूषी वर्चस्वाची सवय तिला लावण्यात आली आहे. चुल आणि मूल हे मंत्र ग्रामीण स्तरावर फार काही बदल झालेला दिसत नाही. परिणामी महिलांचे अनेक प्रश्न निर्माण झालेले आपल्याला दिसत आहेत. बालपणी वडीलावर, तरुणपणी पतीवर व वृद्धापणी मुलांवर अवंलंबून राहण्याची तिची स्थिती संपली नाही.

समानतेचा पुरस्कार करणाऱ्या समाजात आणि विज्ञान युगात स्त्रियांची स्थिती ग्रामीण भागात अत्यंत दयनिय आहे. त्यागाची प्रतिक असलेली ग्रामीण स्त्री विविध समस्यांच्या चक्रात सापडलेली दिसून येते. भारतामध्ये अनेक भागातील ग्रामीण स्त्री ही उपेक्षित, वंचित गटात मोडणारी आहे. समाजात तिला कमी वयात विवाह, मुलीच्या जन्माचा तिरस्कार, हुंड्यासाठी होणारा छळ, संशयाच्या कारणावरून होणारा छळ, सतत आर्थिक कारणास्तव होणारी गळचेपी या ना त्या कारणावरून तिला अनेक अहवानांना सामोर जावे लागत आहे. या सर्वांचे मूळ तीच्या अशिक्षित पणात व उच्च शिक्षणाची संधी न मिळणे यामध्ये दिसून येते. आज ग्रामीण महिला सक्षमीकरणात मोठा अडसर हा शिक्षणापासून वंचित रहात असल्यामुळे स्थिती आहे. त्या अनेक कारणांचा यामध्ये विचार करणे अपेक्षित आहे. सामाजिक परिवर्तनामध्ये खऱ्या अर्थाने उच्च शिक्षण महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. परंतु भारतातील ग्रामीण भागात स्त्रियांचे उच्च शिक्षणाचे प्रमाण नगण्यच आहे. भारतातील ग्रामीण स्त्रियांच्या शिक्षणला अनेक घटक जबाबदार आहेत.

**उद्दिष्टे :**

सदरील शोधनिबंध लिहित असताना खालील काही उद्दिष्टे समोर ठेवली होती.

1) ग्रामीण महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासणे.

2) ग्रामीण महिलांच्या शिक्षणात येणाऱ्या अडथळ्यांचा अभ्यास करणे.

3) ग्रामीण महिलांच्या निरक्षरतेचे परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

सदरील शोध निबंध तयार करत असताना वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला व या शोध निबंधासाठी दुय्यम सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.

महिलांचे समाजातील दुय्यम स्थान हा भारतीय परंपरेचा मोठा परिणाम दिसून येतो. ग्रामीण महिलाकडे घर सांभाळणे आणि मुलांचा सांभाळ या अनुषंगानेच बघितले जाते. त्यामुळे तिच्या शिक्षणाकडे नकारात्मक दृष्टीनेच पाहिले जाते. मुलीने शिकून काय करायचे? हा दृष्टीकोन ग्रामीण समाजात विकसित झाला आहे. त्याचबरोबर कमी वयात विवाह हा पण ग्रामीण महिलाच्या

शिक्षणातील मोठा अडसर ठरलेली आहे. ज्या वयात शिक्षण घेता यायला पाहिजे, त्या वयात तिच्यावर अनेक जबाबदाऱ्या दिल्या जातात व शिक्षणाचे दार बंद केले जाते. स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार जरी होत असला तरी कुटूंबात मुलींच्या शिक्षणात तिला दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधात दुजाभाव केला जातो. मुलांच्या शिक्षणाबाबत जो आग्रह केला जातो तसा मुलींच्या शिक्षणाबाबत केला जात नाही. फक्त मुलींच्या विवाहावर लक्ष केद्रिंत केले जाते.

शिक्षणासंदर्भात स्थानिक सोयी-सुविधाचा अभाव हा सुद्धा त्यांच्या शिक्षणातील खंड पाडण्यात जबाबदार आहे. गावामध्ये जेमतेम प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा आहेत व माध्यमिक शिक्षणासाठी बाहेरगावी ये जा करावी लागते. उच्चा शिक्षण सुविधा तर ग्रामीण भागात अद्यापही निर्माण झाल्या नाहीत. शिक्षणांची कमतरता, शिक्षकाची शिकवण्याबाबतची अनास्था आहे. शिक्षकांचे शाळेत गैरहजर राहण्याचे प्रमाण अधिक आहे. भौतिक सोयी-सुविधा नाहीत. स्वच्छालय नाही, पिण्याचे पाणी स्वच्छ मिळत नाही. परिणामी त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतात व त्यांच्या शिक्षणात उदासिनता येते.

एकूणच भारतात ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी बाहेर गावी जाण्यासाठी वाहतूकीच्या सोयी-सुविधा नाहीत. त्यामुळे पण त्यांच्या उच्च शिक्षणावर विपरित परिणाम होत आहेत. त्याचबरोबर नैसर्गिक संकटे, दुष्काळ, भूकंप, अवर्षण, रोगराई अशा अनेक नैसर्गिक संकटांना सामोरे जावे लागते. नैसर्गिक संकटाचा सर्वात जास्त परिणाम शेती उत्पादनावर होतो. शेती उत्पन्न कमी झाले की कर्जबाजारीपणा अशा समस्यांना समारे जावे लागत आहे आणि त्यामध्ये मुलींच्या शिक्षणासाठी असलेली नकारात्मकता म्हणून मुलींचे शिक्षण होण्यात अडथळे निर्माण होताना दिसून येतात.

आधुनिक काळात महिलांच्या संदर्भात लैगिंक अत्याचाराचा घटना सातत्याने समोर येत आहेत. ग्रामीण भागातसुद्धा अशा घटना घडत असल्याकारणाने त्याचा परिणाम पालकाच्या मानसिकतेवर होत आहे आणि शिक्षणामध्ये खंड पडत आहे. लैगिंक अत्याचाराच्या घटनामुळे ग्रामीण कुटुंब उद्ध्वस्त होण्याची भिती असते. म्हणून पालक मुलींना माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणासाठी बाहेर पाठविण्यासाठी तयार होत नाहीत.

**समारोप :**

एकंदरीतच महिला शिक्षणासाठी समाजाचा महिलांच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा दुय्यम आहे. त्याचबरोबर आर्थिक स्थिती, शेती व्यवसाय, नैसर्गिक संकटे, शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी व वाहतूकीच्या साधनांचा अभाव आणि वाढत्या लैगिंक अत्याचाराच्या घटना या न त्या कारणाने महिलांच्या शिक्षणावर फार मोठा विपरीत प्रभाव पडत असताना दिसून येत आहे आणि महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**संदर्भ :**

1. *भारतीय संमाज, अवाहने आणि समस्या, रा.ज. लोटे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.*
2. *आधुनिक भारतातील सामाजिक समस्या, डॉ. दिलीप खैरनार, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.*
3. *भारतीय समाज, राम अहूजा, रावत पब्लिकेशन, जयपूर*
4. *आधुनिकता और भारतीय समाज, डॅ. अंजू शुक्ला, डॉ. रश्मी पाण्डेय, रोशनी पब्लिकेशन, कानपूर*
5. *लोकसत्ता, वर्तमानपत्र.*
6. *परिवर्तनाचा वाटसरु मासिक*
7. *इंटरनेट*